**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 20 मि.**

**दिनांक:08.10.2023** **वार: रविवार**

---

**ठळक बातम्या**

- **देशाच्या अर्थव्यवस्थेची गुणवत्ता आणि सर्वसमावेशकता कायम राखण्याचं युवकांपुढे आव्हान - केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचं प्रतिपादन.**
- **पुण्यातील ससुन रुग्णालय प्रशासन सज्जतेचा आढावा, उपचार पूर्ण झालेल्या कैद्यांची तातडीनं कारागृहात रवानगी करण्याचे आदेश.**
- **नांदेड जिल्हा कारागृहातील 2 अधिकारी आणि 2 कर्मचारी निलंबित.**

**आणि**

- **आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं पदकांची शंभरी ओलांडून रचला इतिहास.**

**धर्मेंद्र प्रधान**

आगामी काही वर्षात भारताची अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर अव्वल स्थानावर येणार आहेच, पण त्याचवेळी त्यातील गुणवत्ता आणि सर्वसमावेशकता कायम राखण्याचं मोठं आव्हान युवकांसमोर राहणार असल्याचं प्रतिपादन केंद्रीय शिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री धर्मेंद्र प्रधान यानी काल पुण्यात केलं. पुण्यातील गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्था या अभिमत विद्यापीठाच्या 29 व्या वार्षिक दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यावेळी उपस्थित होते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून पुणे हे शिक्षण आणि सामाजिक सुधारणेचं प्रमुख केंद्र राहिलं असून देशाच्या आर्थिक विकासाच्या आरखड्यात गोखले अर्थशास्त्र संस्थेचं योगदान फार मोलाचं राहिलं आहे असे गौरवोद्गार प्रधान यांनी काढले. मराठा आरक्षण, शेतकरी आत्महत्या या विषयांवरील संशोधनात गोखले अर्थशास्त्र संस्थेनं दिलेल्या मोलाच्या योगदानाचा चंद्रकांत पाटील यांनी यावेळी गौरवपूर्ण उल्लेख केला. आगामी काळात राज्याच्या शाश्वत आणि सर्वांगीण विकासाबरोबरच आरोग्य क्षेत्राच्या सुधारणांसाठी संस्थेची मदत लागणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. इयत्ता आठवीपर्यंत शिक्षण हक्क कायद्यानुसार शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, संबंधित विद्यार्थ्याच्या पुढील शालेय शिक्षणाची जबाबदारी काही राज्यांतील सरकारांनी घेतली असून; असा पुढाकार इतर राज्यांनीही घ्यावा अशी अपेक्षाही प्रधान यांनी व्यक्त केली.

**ससून भेट**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार पुण्याचे विभागीय आयुक्त सौरभ राव आणि जिल्हाधिकारी डॉक्टर राजेश देशमुख यांनी काल ससून सर्वसाधारण रुग्णालयाला भेट देऊन पाहणी केली आणि कोणत्याही प्रकारच्या आणीबाणीच्या परिस्थितीला तोंड देण्यास रुग्णालय प्रशासन कितपत सज्ज आहे याचा आढावा घेतला. यासंदर्भातील अंतिम अहवाल येत्या दोन दिवसात राज्य शासनाला सादर केला जाईल असं राव यांनी सांगितलं. राज्यातील नांदेड आणि संभाजीनगर जिल्हा रुग्णालयात घडलेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना स्थानिक सर्वसाधारण रुग्णालयातील डॉक्टर आणि अन्य वैद्यकीय कर्मचाऱ्यांची उपलब्धता, औषधांचा साठा आणि रुग्णांसाठी आवश्यक असणाऱ्या अन्य सोयी सुविधांची पाहणी करण्याचे निर्देश दिले होते.

**ससून**

ससून रुग्णालयात दाखल प्रत्येक कैदी रुग्णांच्या प्रकृतीचा आढावा तातडीने घ्यावा. कैदी नेमका उपचाराच्या कोणत्या टप्प्यावर आहे, याची तज्ज्ञ डॉक्टरांकडून माहिती घ्यावी. तसंच, उपचार पूर्ण झालेल्या कैद्यांची तातडीनं परत कारागृहात रवानगी करावी, असे आदेश बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉक्टर संजीव ठाकूर यांनी दिले आहेत. अमली पदार्थ तस्करीतील मुख्य सूत्रधार ललित पाटील हा शस्त्रक्रियेच्या आदल्या दिवशीच ससून रुग्णालयातून फरार झाला होता, त्या पार्श्वभूमीवर ही दक्षता घेण्यात येत आहे. दरम्यान, कर्तव्यात निष्काळजीपणा करणाऱ्या नांदेड जिल्हा कारागृहातील 2 अधिकारी आणि 2 कर्मचाऱ्यांना काल निलंबित करण्यात आलं आहे.

**मानसिक आरोग्य**

मानसिक आरोग्य हा वैश्विक मानवाधिकार या मध्यवर्ती संकल्पनेसह दहा ऑक्टोबर रोजी नियोजित जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त पुण्यात आज एक पदयात्रा काढण्यात येणार आहे. कनेक्टींग ट्रस्ट आणि इतर अनेक संस्थांतर्फे आयोजित या पदयात्रेत पथनाट्य आणि समुपदेशन यांचा समावेश आहे. या दिनानिमित्त पुण्यातील येरवडा इथल्या प्रादेशिक मनोरुग्णालयातील वरिष्ठ मनोचिकित्सक डॉक्टर संदीप महामुनी यांनी आकाशवाणीशी बोलताना हा संदेश दिला.

*बाईट*

*मानसिक आजार आणि मानसिक आजारावरील उपचार यामध्ये प्रचंड सुधारणा झालेली आहे. बरेच नवीन तंत्र विकसित झालेले आहे, मात्र अजूनही समाजात मानसिक आजार आणि मानसिक आरोग्य याकडे तितकस लक्ष दिले जात नाही. जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त मी सांगू इच्छितो की यावर्षीची थीम आहे. ती मानसिक आरोग्य हे सर्वांचा मूलभूत मानवी हक्क आहे. जर कोणाला मानसिक व्याधी होत असेल तर न घाबरता, संकुचित होता तुम्ही*

*उपचार घेतले पाहिजे. तुम्ही सजनांचा सल्ला घेतला पाहिजे जेणे करून तुम्ही मानसिक आरोग्याबरोबर शारीरिक आरोग्य ही सुद्धा चांगलं ठेवू शकता.*

**या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात...**

**फडणवीस**

आरोग्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी राज्य शासनाने मोठा निधी उपलब्ध करून दिला असून, अकोला इथं अतिविशेषोपचार रुग्णालय पूर्ण क्षमतेनं सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल अकोला इथं दिली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर्वोपचार रूग्णालय इथं दोन दिवसीय महाआरोग्य शिबिराचा शुभारंभ, तसंच शिवापूर आणि बोरगाव मंजू इथल्या रूग्णालयांचं भूमिपूजन आणि हुतात्मा स्मारकाचं उद्घाटन काल फडणवीस यांच्या हस्ते झालं,त्यावेळी ते बोलत होते. अतिविशेषोपचार रूग्णालयासाठी केंद्र शासनानं 120 कोटी आणि राज्य शासनानं 40 कोटी रुपयांचा निधी दिला असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**शब्दगंध**

अहमदनगर मध्ये पंधराव्या जिल्हास्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचं उद्घाटन कृषिमंत्री  धनंजय मुंडे यांच्या हस्ते काल झालं. ऐकूया याविषयीचा वृत्तान्त आमच्या प्रतिनिधीकडून...

*वॉइस कास्ट*

*14 वर्षांपूर्वी सुरू झालेल्या जिल्हास्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाने आता चांगले बाळसे धरले आहे. हे संमेलन राज्यस्तरीय झाले आहे. राज्यातील साहित्यिकांना कवींना आणि कथाकारांना व्यासपीठ देण्याच्या दृष्टिकोनातून या साहित्य संमेलनाची निर्मिती झाली. पंधराव्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन कृषिमंत्री  धनंजय मुंडे यांच्या ा हस्ते झाले. शेतकऱ्यांचे दुःख, वेदना सहन करण्याची ताकद तुमच्या साहित्यातून मिळाली पाहिजे. त्याचबरोबर शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची मानसिकताच तयार होऊ नये असे, साहित्य निर्माण करण्याची शपथ आपण सर्वांनी घेतली पाहिजे. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम भापकर, स्वागताध्यक्ष आमदार संग्राम जगताप, आ. अरुण काका जगताप, माजी संमेलनाध्यक्ष आ. लहू कानडे, माजी संमेलनाध्यक्ष कवी इंद्रजित भालेराव, महापौर रोहिणी ताई शेंडगे  उपस्थित होते. शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य व अहमदनगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन संपन्न होत आहे. दोन दिवसीय संमेलनातील पहिला दिवस संमेलनाचे उदघाटन, लोकसाहित्य जागर यात्रा, कवी संमेलन कथा कथन आणि स्वागताध्यक्ष आमदार संग्राम जगताप यांच्या मुलाखतीने पार पडला. यावेळी  लोकसाहित्य जागर यात्रा काढण्यात आली होती.  या साहित्य यात्रेत सहभागी झाले होते. या लोकजागर यात्रेत वासुदेव, पिंगळा जोशी, गोंधळ पथक, शाहिरी पथक सहभागी झाले होते.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी, मनोज सातपुते, अहमदनगर*

**क्रिकेट**

पुण्याच्या महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतील पाच सामने 21 ऑक्टोबर ते 2 नोव्हेंबर दरम्यान होणार आहेत. याविषयी महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे सचिव सुरेंद्र भांडारकर यांनी आकाशवाणीशी बोलताना अधिक माहिती दिली.

*बाईट*

*वर्ल्ड कपसाठी आपण जोरदार तयारी करत आहोत टोटल कॅपॅसिटी आपली थर्टी सेवन थाउजंड असली तरी काही नियमाप्रमाणे आपल्याला स्कीप कराव्या लागतात. त्याच्यामुळे थोडा सीट्स कमी होतात. त्यामुळे थर्टी टू थाउजंड पर्यंत आपली कॅपॅसिटी येते पार्किंग स्थापन हे वेगवेगळे ठिकाणी केलेले आहेत. त्यासाठी प्लॉट घेतलेले आहेत टोटल 40 एकर आपण पार्किंग साठी घेतलेले आहे. त्या ठिकाणी आपण वेगवेगळे कलरचे बोलून सोडणार आहोत. त्याला पार्किंग नंबर असतील पाऊस जरी आला तरी त्यासाठी आपण ईस्ट आणि वेस्ट साईटला वेगवेगळे सेड्स केलेले आहेत. बीसीसी आणि आयसीसीच्या नियमाप्रमाणे जेवढ्या लांब करता येते तेवढे केलेले आहेत.*

**सप्तशृंगी**

नाशिक जिल्ह्यातील वणी येथील श्री सप्तशृंगी गडाच्या विकासासाठी पर्यटन आराखडा तयार करण्यात येत असून 81 कोटी 86 लाख रुपयांच्या या आराखड्याला लवकरच मान्यता देण्यात येईल, अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल दिली. नाशिक जिल्ह्यातील कळवण आणि सुरगाणा इथल्या 4 शे 94 कोटी रुपयांच्या विकास कामांचं भूमिपूजन पवार यांच्या हस्ते काल झालं, त्यानंतर शेतकरी कृतज्ञता मेळावाही त्यांच्या उपस्थितीत पार पडला त्यावेळी ते बोलत होते.

**तुळजा भवानी**

तुळजापूर इथं श्रीतुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्र उत्सव पुर्वीच्या नऊ दिवसाच्या मंचकी निद्रेस आरंभ झाला असून 15 ऑक्टोबरला घटस्थापना होवून शारदीय नवरात्र उत्सवास आरंभ होणार आहे.

**दसरा महोत्सव**

कोल्हापुरचा शाही दसरा राज्य शासनानं राज्य महोत्सव म्हणून घोषित केला असून यंदा १५ ते २४ ऑक्टोबर होणाऱ्या या महोत्सवांतर्गत ९ दिवस अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी  दिली.

**नक्षलीचे आत्मसमर्पण**

११ लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या रजनी उर्फ कलावती समय्या वेलादी  जहाल महिला नक्षलीनं काल गडचिरोली इथं, पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांच्यापुढे आत्मसमर्पण केलं. आत्मसमर्पण योजनेंतर्गत तिला साडेचार लाख रुपयांची मदत करण्यात येणार आहे.

**आशियाई क्रीडास्पर्धा**

चीनमध्ये हांगचौ इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं पदकांची शंभरी ओलांडून इतिहास रचला आहे. आत्तापर्यंत 28 सुवर्ण, 38 रौप्य आणि 41 कांस्य पदकांसह भारतानं 107 पदके मिळविली आहेत. काल भारतानं 6 सुवर्ण पदकांसह 10 हून अधिक पदकांची कमाई केली. राष्ट्रपति द्रौपदी मूर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर यांनी सर्व खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे. दरम्यान क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना चेन्नई इथं ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणार आहे.

**हवामान**

राज्यात बहुतांश भागांत हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.